## मराठी (प्रथम भाषा) कुमारभारती इयत्ता–दहावी

## ◈ इयत्ता दहावीच्या प्रस्तावित आराखड्यानुसार नमुना कृतिपत्रिका क्र.१

**वेळ– ३ तास** **एकूण गुण–१००**

---

### कृतिपत्रिकेसाठी सूचना

(१) सूचनेनुसार आकलनकृती व व्याकरण यांमधील आकृत्या काढाव्यात.
(२) आकृत्या पेननेच काढाव्यात.
(३) उपयोजित लेखनातील कृतींसाठी (सूचना, निवेदन) आकृतीची आवश्यकता नाही. तसेच या कृती लिहून घेऊ नयेत.
(४) विभाग ५– उपयोजित लेखन प्र.५ (अ) (२) सारांशलेखन या घटकासाठी गद्य विभागातील प्र.१ (इ) अपठित उतारा वाचून त्या उताऱ्याचा सारांश लिहावयाचा आहे.
(५) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.


### विभाग १ गद्य

**पठित गद्य**

प्र. १. **(अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**(१) चौकटी पूर्ण करा.**

आगळची वैशिष्ट्ये ०२



आमची ढाळज म्हणजे गावाचं वर्तमानपत्र होतं आणि आजी त्याची संपादक होती. तर सगळ्या बातम्या तिथं यायच्या. त्यांची शहानिशा व्हायची न् मग त्या गावभर जायच्या. कडुसं पडायच्या आधी ही मैफिल मोडायची. माणसांची वेळ झाली, की म्हातारीची ढाळज सुटायची. माणसं ढाळजंत बसायची. रात्री आठच्या दरम्यान ढाळजंचा दरवाजा लागला आणि एकदा आतनं आगळ टाकली, की वाडा शांत व्हायचा. ही आगळ दरवाजाला लावणं किंवा ती काढणं म्हणजे आमच्यासाठी दिव्य असायचं. मुळात ही सहा फुटांची लांब आणि पाऊण फूट रुंद अशी सागवानी आगळ एका भिंतीतल्या देवळीत आरपार जायची. ती आरपार घालवून दरवाजा उघडणं किंवा तिच्या तोंडाला असणाऱ्या पितळी वाघाच्या जबड्यातील कडीला हात घालून ती बाहेर ओढणं व समोरच्या भिंतीतल्या देवळीत ढकलणं फार अवघड गणित होतं. ही आगळ म्हणजे दरवाजाचं, पर्यायाने वाड्याचं, भरभक्कम संरक्षक कवच होतं. दुपारीही एकदा आगळ टाकली की उन्हाचं, सुट्टीचं आम्हांला बाहेर पडायला संधी नसायची, तसाच रात्री त्या आगळीचा आधारही तितकाच वाटायचा.

भर उन्हात मग आजीला जास्त त्रास होऊ न देता तिथंच ढाळजंत, पडवीत, सोप्यात कुठंही आम्ही बैठे खेळ खेळायचो. चिंचोके, गजगं, खापराच्या भिंगऱ्या, जिबल्या, चुळूचुळू मुंगळा, भोवरा, गोट्या असले खेळ असायचे.

**(२) आकृती पूर्ण करा.** ०१

(i) **बैठे खेळ खेळण्याची ठिकाणं**

(ii) **एका शब्दात उत्तर लिहा.** ०१

(i) लेखकाच्या गावचं वर्तमानपत्र

(ii) वर्तमानपत्राच्या संपादक

**(३) व्याकरण** ०१

(i) खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दाचे प्रत्यय व विभक्ती प्रकार लिहा.

माणसं ढाळजंत बसायची

| शब्द | प्रत्यय | विभक्ती प्रकार |
|---|---|---|
| | | |

(ii) खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दाचे लिंग बदलून वाक्य पुन्हा लिहा. ०१

आजी त्याची संपादक होती.

**(४) स्वमत–**आजच्या काळात एकत्र कुटुंब पद्धतीची आवश्यकता वाटते का? तुमचे मत सोदाहरण लिहा. ०२

**प्र. १. (आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**(१) आकृतिबंध पूर्ण करा.** ०१

(i) **पशूंना भूक लागल्यानंतर सहन न होणाऱ्या गोष्टी**

(ii) **अचूक विधान शोधून लिहा.** ०१

(अ) लेखकाने दिलेले जेवण सोनालीने व्यवस्थित खाल्ले.

(आ) सोनालीने डब्याला फटकारा मारून दूर फेकून दिला.

(इ) सोनालीने लेखकाच्या हातात असलेल्या डब्यातील मटण इतस्तत: विखरून खाल्ले.

(ई) सोनाली अण्णांकडे गुरगुर करत पाहत राहिली.

नेहमी खाण्यासाठी लाडीगोडी करणारी सोनाली आज इतकी रागावलेली होती, की तिनं उडी मारून माझ्या हातातला डबा पंजाने फटकारा मारून दूर उडवला. मटण गच्चीवर इतस्तत: पसरलं. ती गुरगुर करत त्यावर तुटून पडली. पंधरा-वीस मिनिटांत तिनं सर्व फस्त केलं. खाल्ल्यावर सोनाली शांत झाली आणि येऊन माझे पाय चाटू लागली. जणू काही झाल्या प्रकाराबद्दल ती आमची क्षमाच मागत होती.

अण्णांना मी म्हणालो, ''जेवताना पशूंना कोणी फसवलं, त्यांची खोडी काढली अथवा थोडा विलंब जरी लागला तरी ते त्यांना सहन होत नाही.''

सोनालीच्या दातांत विलक्षण ताकद आली होती. एकदा नेहमीप्रमाणे सोनालीला मी रात्री पितळी पातेल्यामधून दूध प्यायला दिलं. तेवढ्यात कोणीतरी आलं म्हणून मी तसाच उठलो. पातेलं परत न्यायचं विसरलो. इकडे सोनालीने दूध पिऊन झाल्यावर पातेलं चावायला सुरुवात केली. रात्रभर तिची त्या पातेल्याशी मस्ती चालू होती. सकाळी उठल्यावर मी गच्चीवर गेलो. पाहतो तर त्या पितळी पातेल्याची सोनालीने अक्षरश: चाळणी केली होती. वन्यपशूंच्या दातांत केवढी ताकद व चिवटपणा असतो. याचा मला अनुभव आला.

**(२) वैशिष्ट्ये लिहा.** ०१

(i) वन्यपशूंचे दात (१)..................... (२).....................

(ii) **पितळी पातेल्याची चाळणी केल्याच्या घटनेचा ओघतक्ता तयार करा.** ०१

**दूध प्यायली**

↓

____________

↓

____________

↓

____________

**(३) व्याकरण** ०१

(i) पुढील वाक्यांतील अधोरेखित शब्दांची जात ओळखून लिहा.

पंधरा-वीस मिनिटांत तिनं सर्व फस्त केलं.

| शब्द | जात |
|---|---|
| तिनं | |
| सर्व | |

(ii) सहसंबंध लिहा. ०१

(अ) खोडी : खोडकरपणा :: ............. : चिवटपणा

(आ) पाय : ............. :: विलंब : उशीर

**(४) स्वमत–** तुम्हांला कोणत्याही पाळीव प्राण्याबाबत आलेला अनुभव तुमच्या शब्दांत लिहा. ०२

**प्र. १. (इ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**(१) कारणे शोधा.** ०२

(अ) पोट धरधरून हसणारी माणसे तिऱ्हाईताला वेडी वाटतात कारण.....

(आ) मोठेपणी मोकळेपणाने काही लोक हसतात कारण.....

माणसाने हसावे किंवा हसू नये, असा प्रश्न कोणी कोणाला विचारणार नाही. माणसे प्रथम हसतात. नंतरही हसतात. हसून मोकळी होतात. हसण्यामुळे मन मोकळे होते. वृत्ती उल्हसित होतात. हास्य ही एक शारीरिक आणि मानसिक अशी संयुक्त क्रिया आहे. हसणाऱ्याची मुद्रा, तिच्यावरचे स्नायू, ऊर आणि आतील इंद्रिये असा कितीतरी भाग हसण्यात गुंतलेला असतो. हास्य ही अनेक प्रक्रियांची मालिका असते. अलीकडे 'हास्यसाधना' या नावाचा एक प्रयोग केला जातो. समाजातली जाणती माणसे ठराविक वेळी ठरवून एकत्रित येतात. पोट धरधरून, खळखळून मोठमोठ्याने हसतात. ज्याला ती का हसतात हे माहीत नसते, त्याला ती वेडी वाटतात; पण हे पत्करलेले वेड असते. ते पांघरलेले नसते. या वेडात शहाणपण दडलेले असते. त्याला मुक्तीचे पंख असतात. आजकालच्या अति औपचारिक आणि कृत्रिम जीवनपद्धतीत माणसे आंबून, अवघडून जातात. त्यांच्या जीवनावर मळभ दाटते. ते दूर व्हावे म्हणून पोरवयात जसे आपण मोकळेपणे हसतो, तसे मोठेपणी हसून घ्यावे असे ज्यांना मनापासून वाटते, ते गंभीर प्रकृतीचे लोकही हल्ली हसण्यासाठी उत्सुक असतात. वस्तुत: हसण्यासाठी पैसे पडत नाहीत, भांडवल लागत नाही; पण तरी माणसे दिलखुलासपणे हसत नाहीत. सदैव हसतमुख असणे हे आनंददायक असते; पण ती झाली केवळ मुद्रा, हावभाव किंवा अभिव्यक्ती!

**(२) चौकटी पूर्ण करा.**

(i) **व्यक्तीला होणारे हास्याचे फायदे** ०१

→ [ ] [ ]

(ii) फरक स्पष्ट करा ०१

| पत्करलेले वेड | पांघरलेले वेड |
|---|---|
| (i) ............... | (i) ............... |

**(३) व्याकरण** ०२

सूचनेनुसार सोडवा.

(i) हास्य ही अनेक प्रक्रियांची मालिका असते. (वाक्याचा काळ ओळखा)

(ii) 'माणसे' शब्दासाठी उताऱ्यातील विशेषण शोधा.

(iii) हास्यामुळे मन मोकळे होते. (अधोरेखित शब्दाचे अनेकवचन वापरून वाक्य पुन्हा लिहा.)

(iv) 'मोठेपणी' या शब्दाच्या विरुद्धार्थी शब्द उताऱ्यातून शोधा.

**(४) स्वमत–** 'सदैव हसतमुख राहणे आनंददायी असते' या विधानाबाबत तुमचे मत स्पष्ट करा. ०२

**विभाग २ पद्य**

**प्र. २. (अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**(१) 'अ' गट व 'ब' गट यांच्या जोड्या जुळवा.** ०२

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| (i) खोटी नसतात नाणी | (अ) जिद्दीने प्रयत्न करा. |
| (ii) घट्ट मिटू नये ओठ | (आ) गप्प न राहता मनाला संधी द्यावी. |
| (iii) झरा लागेलच तिथे | (इ) सगळे लोक, अनुभव वाईट नसतात. |
| (iv) खोद आणखी थोडेसे | (ई) यश नक्की प्राप्त होईल. |

*खोद आणखी थोडेसे*
*खाली असतेच पाणी*
*धीर सोडू नको, सारी*
*खोटी नसतात नाणी.*

*घट्ट मिटू नये ओठ*
*गाणे असते गं मनी*
*आर्त जन्मांचे असते*
*रित्या गळणाऱ्या पानी.*

*मूठ मिटून कशाला*
*म्हणायचे भरलेली*
*उघडून ओंजळीत*
*घ्यावी मनातली तळी.*

*झरा लागेलच तिथे*
*खोद आणखी जरासे*
*उमेदीने जगण्याला*
*बळ लागते थोडेसे!*

**(२) तक्ता पूर्ण करा.** ०२

कवयित्रीच्या मते काय करावे व काय करू नये ते लिहा.

| काय करावे | काय करू नये |
|---|---|
| (i) ............... | (i) ............... |
| (ii) ............... | (ii) ............... |

**काव्यसौंदर्य**

**(३) ''उमेदीने जगण्याला बळ लागते थोडेसे'' या काव्यपंक्तीतील विचारसौंदर्य स्पष्ट करा.** ०२

**(४) ''मेहनत केली की यश हमखास मिळतेच' या विधानाबाबत तुमचा अनुभव लिहा.** ०२

**प्र. २. (आ) खालील मुद्द्यांच्या आधारे कोणत्याही एका कवितेसंबंधी खालील कृती सोडवा.** ०८

(१) आश्वासक चित्र (२) वस्तू

(१) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री (०१) गुण

(२) कवितेचा रचनाप्रकार (०१ गुण)

(३) कवितेचा विषय (०१ गुण)

(४) कवितेतून व्यक्त होणारा भाव (स्थायी भाव) (०१ गुण)

(५) कवितेतील आवडलेली ओळ (०२ गुण)

(६) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे (०२ गुण)

**प्र. २. (इ) खाली दिलेल्या काव्यपंक्तीचे रसग्रहण करा.** ०४

अपकीर्ति ते सांडावी । सत्कीर्ति वाडवावी ।
विवेके दृढ धरावी । वाट सत्याची ।।१०।।

## विभाग ३– स्थूलवाचन

**प्र.३. खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** ०६

(१) मधूचे कृत्य संवेदनशील मनाचे उत्तम उदाहरण आहे. या विधानाबाबत तुमचा अभिप्राय स्पष्ट करा.

(२) खालील संकल्पनामधील सहसंबंध स्पष्ट करा.

(अ) बी चे झाडात रूपांतर होणे. (आ) माणसाचे माणूसपण जागे होणे.

(३) खालील मुद्द्यांना अनुसरून लेफ्टनंट स्वाती महाडिक यांच्याशी संबंधित परिच्छेद तयार करा.

(i) त्यांचे शिक्षण (ii) त्यांचा निर्धार (iii) त्यांचा स्वभाव

## विभाग ४– भाषाभ्यास

**प्र.४. (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती.**

**(१) समास**

खालील सामासिक शब्द व त्यांचे प्रकार यांच्या योग्य जोड्या लावा. ०२

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| (i) हरघडी | (अ) द्विगू |
| (ii) क्रीडांगण | (आ) अव्ययीभाव |
| (iii) आईवडील | (इ) विभक्ती तत्पुरुष |
| (iv) पंचप्राण | (ई) द्वंद्व |

**(२) अलंकार**

खालील वैशिष्ट्यांवरून अलंकार ओळखा व समर्पक उदा. द्या. ०२

(१) एखाद्या घटकाचे वर्णन करणे.

(२) ते वर्णन पटवून देण्यासाठी योग्य उदाहरण देणे.

(अ) अलंकाराचे नाव ☐ (आ) अलंकाराचे उदाहरण ☐

**(३) खालील काव्यपंक्तीतील वृत्त ओळखा** ०१
**'द्रव्यास हे गमन मार्ग यथावकाश'**

**(४) शब्दसिद्धी** ०२

(१) वर्गीकरण करा.

खालील शब्दांचे प्रत्ययघटित व उपसर्गघटित वर्गीकरण करा.

सामाजिक, अभिनंदन, नम्रता, अपयश

| प्रत्ययघटित | उपसर्गघटित |
|---|---|
| (i) .............. | (i) .............. |
| (ii) .............. | (ii) .............. |

**(५) सामान्यरूप–तक्ता पूर्ण करा.** ०१

| शब्द | सामान्यरूप |
|---|---|
| (i) संगीताने | (i) .............. |
| (ii) हाताला | (ii) .............. |

**(६) वाक्प्रचार–**(i) दिलेल्या वाक्यांत योग्य वाक्प्रचारांचा वापर करून वाक्य पुन्हा लिहा. ०१

(कपाळाला आठी पडणे, सहीसलामत बाहेर पडणे, भान विसरणे)

(अ) सुनामीच्या तडाख्यात सापडलेल्या लोकांना भारतीय जवानांनी सुखरूप बाहेर काढले.

(आ) दिवाळीसाठी आणलेले नवीन कपडे नमिताला न आवडल्यामुळे तिने नाराजी व्यक्त केली.

(ii) तक्ता पूर्ण करा. ०१

| वाक्प्रचार | अर्थ |
|---|---|
| (i) आगीत उडी घेणे | .................. |
| (ii) .................. | खूप राग येणे |

**प्र.४. (आ) भाषासौंदर्य.**

(१) **शब्दसंपत्ती**

(१) पुढील शब्दाचे दोन अर्थ लिहा. ०१

[ ] ← रजनी → [ ]

(२) **पुढील शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा.** ०१

(i) वर्षातून एकदा प्रसिद्ध होणारे [ ]

(ii) दुसऱ्यावर अवलंबून असलेला [ ]

(३) **खालील शब्दांतील समानार्थी व विरुद्धार्थी शब्दांच्या चार जोड्या तयार करा.** ०१

कमाल, अव्याहत, नेहमी, किमान, आंधळा, दुरित, डोळस, दुष्कर्म

| समानार्थी शब्द | विरुद्धार्थी शब्द |
|---|---|
| .................. | .......... × ........ |
| .................. | .......... × ........ |

(४) **दिलेल्या शब्दातून चार अर्थपूर्ण शब्द लिहा.** ०१

गगनभरारी– [ ] [ ] [ ] [ ]

(२) **लेखननियमांनुसार लेखन**

(i) अचूक शब्द ओळखा. ०१

(अ) कल्पवृक्ष, कप्लवृक्ष, कल्पव्रक्ष, कल्पवुक्ष

(आ) सस्कृती/संसकृती/संस्कृति/सस्कंृती

(ii) खालील वाक्य लेखननियमांनुसार लिहा. ०१

आपल्या पूरवजांनी वेरूळ अजींठा बनवलाय

(३) **विरामचिन्हे–**

(i) प्रस्तुत वाक्यांतील चुकीची विरामचिन्हे ओळखा व ती दुरुस्त करून वाक्य पूर्ण करा. ०१

मी तिला म्हटले. कर्व्यांच्या पुतळ्यापाशी बसून रडायला तुला काहीच कसे वाटत नाही!

(ii) खाली विरामचिन्हांचा उपयोग दिला आहे, त्यानुसार त्या आशयाचे विरामचिन्ह चौकटीत भरा. ०१

(i) बोलणाऱ्याच्या तोंडचे शब्द दाखविण्यासाठी [ ]


(ii) दोन शब्द जोडण्यासाठी किंवा जोडशब्दातील पदे सुटी करून दाखविण्यासाठी [ ]

(४) **पारिभाषिक शब्द–**

(i) खालील शब्दांना प्रचलित मराठी भाषेतील शब्द लिहा. ०१

(अ) Absence [ ] (आ) Dismiss [ ]

(५) **बाजूच्या चौकटीत कोणता पर्याय लिहिल्यास चारही अर्थपूर्ण शब्द तयार होतील तो पर्याय निवडा.** ०१




पर्याय– (१) लपट (२) टपाट (३) टपट (४) हपट

## विभाग ५ उपयोजित लेखन

**प्र.५. (अ) खालील कृती सोडवा.**

**(१) पत्रलेखन** ०५

**खालील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा.**

रसिकांसाठी सुवर्णसंधी!!!

*'ब्रह्मानंद' संस्था वर्धा द्वारा आयोजित*

**'दिवाळी पहाट'**

दि.५ नोव्हें

घरपोच तिकिटाची विशेष सोय

संगीताचा बहारदार कार्यक्रम

गायक– पंडित सदाशिव शास्त्री

व विनिता गायकवाड

अध्यक्ष– वैष्णवी शृंगारपुरे (कलेक्टर वर्धा)

निवेदन– स्वरूपा वागळे

त्वरा करा! त्वरा करा! नाराजी टाळा

सकाळी ६ वाजता

टाऊन हॉल वर्धा

| | | |
|---|---|---|
| एक रसिक या नात्याने कार्यक्रमाच्या तिकिटांची घरपोच मागणी करा. | किंवा | एक रसिक या नात्याने तिकिटे न मिळाल्याने दुसऱ्या दिवशी कार्यक्रम सादर करण्याची विनंती करा. |

**(२) सारांशलेखन** ०५

**विभाग – १ गद्य विभागातील प्र.१ इ मधील अपठित उताऱ्याचा १/३ एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.**

**प्र.५. (आ) जाहिरातलेखन.**

**(१) खालील शब्दांचा वापर करून एक आकर्षक जाहिरात तयार करा व तिचे पुनर्लेखन करा.** ०६

शालोपयोगी वस्तूंचे दुकान

पुस्तके, दप्तर, वॉटर बॅग आणि इतर सर्व साहित्य.

ग्राहकांचे समाधान, मजबूत वस्तू, आकर्षक रंग


**(२) कथापूर्ती–** ०६

**खाली कथेचा शेवट दिलेला आहे. त्याची सुरुवात लिहून कथा पूर्ण करा.**

.............. प्रवासी रेल्वेगाडी बरोबर स्पर्धा करणारा ससा स्वसामर्थ्यावर खूपच खूश होता. जंगलात जाऊन नाचला काय! बागडला काय! जोरजोरात ओरडून घोषणा करू लागला, ''मी रेल्वेपेक्षाही वेगाने धावू शकतो. सर्व प्राण्यांना सशाच्या कर्तृत्वाचे कौतुक वाटले. पण बुद्धिमान कोल्ह्याला मात्र सशाचे कृर्तत्व मान्य नव्हते. हे बघ सशा! तू जर आगगाडीबरोबर शर्यत जिंकून दाखवली तर मी मान्य करीन तुझं कर्तृत्व. सशाने होकार दिला. दुसऱ्या दिवशी कोल्ह्याच्या साक्षीने ससा आगगाडी बरोबर धावू लागला. ती गाडी मालगाडी होती. ती कुठेही थांबली नाही. सशाची अवस्था अती धावल्यामुळे वाईट झाली. शेवटी रूळाच्या बाजूच्या काटेरी जंगलात ससा पडला. जखमी झाला. आपल्या क्षमतेपेक्षा अधिक काम करण्याचे हे परिणाम! बिच्चारा व्यथित ससा!


**प्र.५. (इ) लेखनकौशल्य खालीलपैकी कोणतीही एक कृती सोडवा. (१०० ते १२० शब्द)** ०८

**(१) प्रसंगलेखन**




सदर बालसाहित्य संमेलनातील स्पर्धेचे तुम्ही विजेते आहात अशी कल्पना करून त्या प्रसंगाचे लेखन करा.

**(२) आत्मकथन**




वरील घटकांचे निरीक्षण करून त्यांचे आत्मकथन लिहा.